Our Ref.:SH/PHY-TRF/SEP/2025 September 5, 2025

| | |
|---|---|
| **BSE Ltd.**<br>Phiroze Jeejeebhoy Towers<br>Dalal Street<br>MUMBAI -400 001<br><br>**Scrip Code: 500620** | **National Stock Exchange of India Limited**<br>Exchange Plaza, 5th Floor, Plot No C/1,<br>G Block, Bandra-Kurla Complex,<br>Bandra (E), Mumbai – 400051<br><br>**Symbol - GESHIP** |

**Sub: Newspaper publication regarding special window for re-lodgement of transfer requests of physical shares of The Great Eastern Shipping Company Limited**

Dear Sir,

SEBI through its circular dated July 02, 2025, has opened a special window for shareholders to re-lodge transfer requests of physical shares, which were lodged prior to the deadline of April 01, 2019, and rejected / returned / not attended to due to deficiency in the documents / process /or otherwise. This window has been opened from July 07, 2025, till January 06, 2026. All such re-lodged securities will be processed only in demat form as per regulatory guidelines.

As per the directions of SEBI, the Company has publicized the opening of this special window through its social media pages and placed newspaper advertisement second time in the edition dated September 5, 2025, of Business Standard and its Marathi translation in Sakal (newspaper advertisement attached).

Shareholders of the Company holding physical shares with previously rejected transfer requests are requested to re-lodge their documents and reach out to our RTA, Kfin Technologies Limited at einward.ris@kfintech.com or the Company at : shares@greatship.com.

This is for your information and record.

Thanking You,

Yours faithfully,
For **The Great Eastern Shipping Co. Ltd.**

Anand Prabhakar Punde
Digitally signed by Anand Prabhakar Punde
Date: 2025.09.05 13:11:42 +05'30'

**Anand Punde**
**Company Secretary.**
**Email : anand_punde@greatship.com**

# कैलासपती आणि चंदन

## पुष्पांजली


**डॉ. कांचनगंगा गंधे** (पुणे)
**अशोककुमार सिंग** (लखनौ)



कैलासपती


चंदन

ओंकाराने सजीव सृष्टी निराकारातून निर्माण केली. त्यात काही अद्‌भुत शक्ती निर्माण झाल्या. त्यापैकी श्री गणेशाची माता (पार्वती-स्त्रीशक्ती) आणि पिता (महादेव-पुरुषशक्ती) यातून ब्रह्मांडाचा आरंभ झाला असे मानतात. या आदिशक्तीतून निसर्गाचे सृजन होते. निसर्गातल्या शक्तींची पूजा आपल्या संस्कृतीत काही चिन्हांच्या माध्यमातून करण्याची प्रथा आहे. शिवपिंडी हे त्यातील एक, जे चेतना आणि आदिम दैवी शक्तीचे प्रतीक मानतात. शिवपिंडी आणि त्यावर अलंकार म्हणून परिधान केलेल्या 'वासुकी' नागराजाच्या पूजेचे महत्त्व हिंदू मूर्तिशास्त्रात सांगितले आहे.

'कैलासपती' या वृक्षाच्या फुलांची आतील रचना आणि शिवपिंडी व त्यावरचा नागराज यांच्यात बरेच साधर्म्य आहे. या वृक्षाला ८-१० वर्षांनी खोडावर येणाऱ्या जाडजूड लोंबत्या उपशाखांवर जणू शंकराच्या जटेवर फुले येतात. शास्त्रीय परिभाषेत याला 'काऊलीफ्लोरी' म्हणतात. एका वेळेस सुमारे १००० फुलं आणि कळ्या येणारा हा एकमेव वृक्ष असावा. रात्रीपासून सकाळपर्यंत या फुलांना तीव्र, पण उत्साह वाढविणारा वास येतो तो मुख्यत्वे करून युजेनॉल, नेरॉल, टर्पिन्स आणि इतर रासायनिक द्रव्यांमुळे. सहा इंच व्यासाच्या ठसठशीत फुलांच्या पाकळ्या तुकतुकीत, गुलबट, तांबड्या आणि तळाशी पिवळट पाकळ्या आतल्या भागांचं रक्षण करतात. फुलाच्या मध्यभागी स्त्रीकेसराचे थोडेसे उभट गोलाकार 'बीजांड' असते ते 'शिवपिंडी'सारखे दिसते. फुलात मध नसतो पण बीजांडाभोवती नाकाम (स्टराईल) पुंकेसर असतात ते खाण्यासाठी मधमाश्या, सुतार मधमाश्या फुलाच्या आतपर्यंत जातात. शिवपिंडीसारख्या बीजांडावर एका बाजूला नागाच्या फण्यासारखे पिवळे जर्द सक्षम (फरटाईल) परागकोश असतात. फुलातली ही शिवपिंडी आध्यात्मिक शक्ती, प्रजनन क्षमता, निर्मितीच्या, प्रकृतीच्या आणि आदिम ऊर्जेच्या नियंत्रणाचे प्रतीक मानतात तर नागफणीसारखे परागकोश अहंकार आणि भ्रम यावर प्रभुत्व असल्याचे दर्शवितात. केरळमध्ये शिवलिंगीची फुले आवर्जून देवाला वाहतात. फुलातल्या या रचनेमुळे या वृक्षाला शिवलिंगी, नागलिंगम अशीही नावे आहेत. वनस्पतिशास्त्रात हा वृक्ष 'कौरवपिता गुआनेन्सीस' नावाने ओळखला जातो. या नावाचा कौरवांशी नातेसंबंध नाही.

'कौरवपिता' या झाडाला दक्षिण अमेरिकेतल्या 'बम्बरा' या बोलीभाषेत 'कौरोपिताऊमाऊ' असं नाव आहे, म्हणजे नैसर्गिक सामर्थ्य, लवचिकपणा आणि वंशाचा वारसा! दक्षिण अमेरिकेतल्या 'गियाना'वरून 'गुआनेन्सीस' म्हणतात. या झाडाला 'तोफगोळा' असे नाव त्या झाडाला येणाऱ्या फळाच्या आकारामुळे आणि फळ पिकल्यावर जेव्हा फुटते तेव्हा आवाजही तसाच येतो. एका झाडाला १५० फळं सहज लटकतात. त्यातल्या गराचा कुजल्यासारखा वास येतो. गर खायला विशेषतः वटवाघळं येतात. कैलासपती वृक्षाला हिंदू संस्कृतीमध्ये फुलाच्या आतल्या भागातल्या रचनेमुळे पवित्र मानले आहे. मंदिराजवळ हा वृक्ष सहसा लावत नाहीत कारण फळं खायला वटवाघळं येतात. परंतु सुवासिक फुलांमुळे विविध प्रकारचे किडे, मधमाश्या येत असल्यामुळे तेथील अन्नजाळ्या आणि अन्नसाखळ्या अबाधित राहायला मदत होते.

श्री गणेशाची आणि देवदेवतांची पूजेच्या आरंभी कपाळावर चंदनाचा टिळा लावण्याची प्रथा आहे. चंदनाच्या सुगंधामुळे मन एकाग्र होते.

**चन्दनस्य महत पुण्यं पवित्रं पाप नाशनम**
**आपदं हरति नित्यं लक्ष्मी तिष्ठती सर्वदा**

चंदन म्हणजे शुद्ध अध्यात्म आणि शीतलता यांचे प्रतीक. चंदनाच्या खोडाप्रमाणे चंदन फुलांनाही वास येतो; परंतु तो खोडापेक्षा मंद आणि सुंदर येतो. त्या शांत वातावरणात देवाच्या ध्यानधारणेसाठी मन एकाग्र होते. म्हणून चंदन फुलं शुद्धता, अध्यात्म आणि शांततेचं प्रतीक मानतात. लक्ष्मी, विष्णूची पूजा चंदन फुलांनी करण्याची परंपरा हिंदू संस्कृतीमध्ये आहे. चंदनाची पूर्ण उमललेली फुलं गडद लाल (मरून), गुच्छात, पानाच्या बेचक्यात, डहाळीच्या बेचक्यात येतात. संदल आणि पाकळ्या एकत्र (पेरीयांथ), त्रिकोणी आकाराच्या असतात. फुलांमध्ये सॅनटोलॉल आणि तशाच प्रकारच्या काही रासायनिक घटकांमुळे मंद सुवास येतो, परंतु तो खोड इतका येत नाही. या वासामुळे आणि लाल रंगामुळे विविध प्रकारचे किडे, मधमाश्या, भुंगे मध खाण्यासाठी फुलाच्या मध्य भागापर्यंत येतात. फळं तयार झाली की ती औषधात वापरतात. चंदनाची फुलं अनेक धार्मिक कार्यात, समारंभात वापरतात.

कैलासपती आणि चंदन फुलांच्या वासामुळे देवाला वाहण्याचा प्रघात आहे त्यामुळे मन एकाग्र होते.

# तुझे ठायी माझी भक्ती...

## संतांचा श्रीगणेश


**राजश्री मराठे**


श्री महासाधू मोरया गोसावींच्या वंशातील गणेशभक्त चिंतामणी महाराजांचे थोरले चिरंजीव धरणीधर महाराज. मोरयाचा वरदहस्त प्राप्त झालेले धरणीधर महाराज एक थोर साक्षात्कारी संतपुरुष होते. गणेशभक्ती करताना अनेक पदरचनांची स्फूर्ती त्यांना झाली. आराध्य श्रीगणेशाचे चिंतन, भक्ती धरणीधर महाराजांच्या पदांमधून व्यक्त होते.

**गणपतिविण दुजे काही नाही हो ॥**
**जप तप तीर्थे व्रते आणि दाने ।**
**होती ज्याचे नामि नामि हो ।**
**भक्तिज्ञान वैराग्य सेवन होईल ।**
**स्मरता तुजलागी हो ॥**

ज्याच्या नामामध्येच सगळे सामावून गेले आहे, अशा या गणराजाच्या भक्तीचे माहात्म्य ठायी-ठायी वर्णिले आहे. जप, तप, व्रते, दाने सगळे काही गणपतीच आहे.

**पहा शेंदूर चर्चित माझा मोरया हो ॥**
**सिंहासनावरी सुखे बैसुनि करी ।**
**फरश अंकुश घेउनि विघ्ने हारि हो ॥**
**विशाळ दोंदावरी । नाग मंडळ भारी ।**
**अपूर्व चंद्र शिरी एकदंत हो ॥**
**सूक्ष्म अवलोकने । भक्त भक्त जाणे ।**
**कर्णाचे चालणे खूण दावि हो । धरणीधरा ध्यान ।**
**प्रणवाकृति जाण । दासा करी पावन धन्य धन्य हो ॥**

विघ्ननाशन करणाऱ्या गणपतीचे वर्णन सोप्या शब्दांतून महाराज साकारतात. गणपतीची प्रणवाकृती डोळ्यासमोर आणून भक्ती केली की दासाला हा गजानन पावन करतो. मोरया शेंदूरचर्चित, विशाल उदर, एकदंत, मस्तकावरील चंद्रकोर असणारे गणेशरूप ॐकाररुपी ही मूर्ती आहे.

तो जगताचा सत्ताधीश आहे, भक्तांचा रक्षणकर्ता श्रीगणेश आहे. त्याचीच भक्ती करा.

**भज भज श्रीगणेश । विद्याधीश ।**
**शुंडादंडविराजित ॥**
**सर्वारंभी ज्याते ध्याती ।**
**मुनिवर सकल सुरेश ॥**
**ज्याचे सत्ता मात्रे करुनी नभी भ्रमत दिनेश ।**
**गुण अगणित वर्णिता ज्याचे ।**
**कुंठित झाला फणीश ॥**

श्रीशिवशंकरही त्याचे गुण वर्णन करताना कुंठित झाला.

माझे सर्वस्व फक्त गणराय, मला दुसरा त्राता नाही.

**गणराया दृढ धरिले म्या पाया ॥**
**इष्टमित्र सह बंधु गोत गण ।**
**तुजवीण नसे मज कोणी सखया ॥**
**तारी अथवा मारी बापा ।**
**अपराध म्यां केले बहुतचि वाया ॥**
**दीन जनांसी रक्षण केले ।**

धरणीधर महाराजांच्या पदांतून भेटीसाठी तळमळ दिसून येते.

**कधी पाहीन मी पाय गणेशाचे ।**
**सार्थक होईल जन्माचे ॥**
**तुझ्याशिवाय मी कोणाला शरण जाऊ?**
**कोणाते शरण जावे तुजवीण ।**
**आहे मी अज्ञान कृपा करी ॥**
**जळावीण मीन जसा तळमळ करितो ।**
**तैसी गत होय मजला रे ॥**
**कोणी तरि दाखवा मज ।**
**तो सिद्धिपती महाराज ॥**
**धरणीधरा दाखवी पाय ।**
**सुख ब्रह्मांडी न माय ॥**

अशा तळमळीने महाराज गणराजाला हाक मारतात, तेव्हा त्यांना साक्षात्कार होतो.

धरणीधर महाराजांची भाषा सामान्यांना मोरयाप्रत नेणारी आहे. ते दोन अभंगात जिभेलाच सांगतात,

**नामरस रसने जरि घेसी । तरि भव हा तरसी ॥**
**गजाननाच्या नामस्मरणे स्वानंदपुरि राहसी ॥**

नामाचा महिमा न जाणल्याने काय होईल तो इशारा पुढे देतात,

**नामाचा महिमा तू न जाणसि**
**होसिल नरकवासी ॥**
**पुढील पदात ते म्हणतात,**
**घेई रसने सुरस नाम घेऊ गे ।**
**येणे होसिल तू धन्य गे ॥**

माझ्या मोरयाचे सुरस नाम तू घेत जा त्यामुळे तू धन्य होशील. नामरसाचे अमृतपान घेऊन पहा.

**दधि घृत मधु सिता तुज प्रिय गे ॥**
**परि ऐसी गोडी नाही गे ॥**
**विविध अन्न फलादिक सर्व गे ।**
**परि त्याज्य अवीट नाही गे ॥**

माणसाचे अधःपतन दुसऱ्याची नित्यनेमे निंदा करण्याने होते ते जिभेला आवडते परंतु त्याने भले होण्यापेक्षा अधःपात होतो. मोरयाचे गोड नाम तू घे. जिभेलाच महाराज सांगतात.

**आणखि एक निंदा तुज प्रिय गे ।**
**तेणे अधःपतन होय गे ।**

पुढे,

**नाम घ्या रे मोरयाचे ।**
**तरि सार्थक जन्माचे ॥**
**कलियुगी नामाविण ।**
**अन्य नसे उपाय ॥**
**अनेकानेक गायकांनी गायिलेले प्रसिद्ध पद म्हणजे –**
**तुज मागतो मी आता ।**
**मज द्यावे एकदंता ॥**
**तुझे ठायी माझी भक्ती ।**
**विरूढावी गणपती ॥**
**तुझे ठायी ज्याची प्रीती ।**
**त्याची घडावी संगती ॥**
**मोरया या मंत्राचे उच्चारण सदैव करा.**



**कोणतेही बंधन मंत्रोच्चारासाठी नाही.**
**अनंत जन्माची सुकृताची जोडी ।**
**तेव्हा ती आवडी भजनाची ॥**

नामस्मरणातून मोरयाची भक्ती करा, असे अनेक पदांतून धरणीधर महाराज सांगतात, श्रीगणरायास काहीच न मागता फक्त मोरयाची भक्ती मागतात.

**एक माझी विनंति परिसावी ।**
**निरंतर भजनसेवा घ्यावी ॥**
**तुजवीण अन्याची करी ना स्तुति ।**
**कुंठित व्हावी तत्काळ माझी मती ॥**
**जिकडे जिकडे मनाची होय गति ।**
**तिकडे तिकडे व्यापक गणपती ॥**

अशा पदांतून निष्काम भक्ती करता यावी अशी प्रार्थना मोरयाचरणी महाराज करतात.

मोरया गोसावींच्या गणेशभक्तीने मोरगावचे मयुरेश्वर चिंचवडला प्रकटले. चिंचवड हे गणपतीच्या साडेतीन पीठांपैकी अर्धपीठ आहे. चिंचवडक्षेत्राला देव भक्तांमुळे अपरंपार महत्त्व आहे. गणेशभक्तीचा वारसा आणि धरणीधर महाराजांच्या पदरचना सोप्या, अनुभवसिद्ध शब्दांत गणराजाजवळ गणेशभक्तांना घेऊन जाणाऱ्या आहेत. त्यातून बोध घेऊन गणेशभक्ती जीवनभर करत राहून चराचरी व्यापून असलेले गणेशतत्त्व अनुभवण्यासाठीच धरणीधर महाराज पुनःपुन्हा सांगतात -

**श्रीगजानन, जय गजानन,**
**जय जय गजानन, वदा वदा ॥**
**मंत्रराज हा सेवि सदोदित ।**
**त्यज त्यज अवघा भवधंदा ॥**
**मंगलमूर्ती मोरया ॥**

# 'एबीसी'च्या अध्यक्षपदी करुणेश बजाज

पुणे, ता. ४ : 'आयटीसी लिमिटेड'चे कार्यकारी उपाध्यक्ष (मार्केटिंग आणि एक्स्पोर्ट्‌स) करुणेश बजाज यांची २०२५-२०२६ या वर्षासाठी 'ऑडिट ब्युरो ऑफ सर्क्युलेशन्स'चे (एबीसी) अध्यक्ष म्हणून एकमताने निवड झाली.

बजाज यांनी 'सिम्बायोसिस इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट'मधून एमबीए-मार्केटिंग केले आहे. बजाज यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात श्रीराम इंडस्ट्रिअल एंटरप्रायझेस लिमिटेडमधून केली. ब्रँड बिल्डिंग, मार्केटिंग स्ट्रॅटेजी, एफएमसी आणि रिटेल क्षेत्रातील नेतृत्वात जवळपास तीन दशकांहून अधिक काळ कार्यरत असलेले आणि सध्या 'आयटीसी लिमिटेड'मध्ये 'आयटीडी'चे कार्यकारी उपाध्यक्ष (मार्केटिंग आणि एक्स्पोर्ट्‌स) म्हणून सक्रिय आहेत.

'आयटीसीएल'मधील आपल्या २५ वर्षांच्या कार्यकाळात करुणेश बजाज यांनी जनरल मॅनेजर मार्केटिंग, प्रॉडक्ट डेव्हलपमेंट, सप्लाय चेन आणि ग्रुप ब्रँड हेड (बिस्किटे) यांसारख्या अनेक वरिष्ठ पदावर काम केले आहे. 'आयटीसीएल'च्या पूर्वी बजाज यांनी भारती रिटेल लिमिटेड (भारती- वॉलमार्ट जेव्ही) येथे ब्रँड्‌सचे प्रमुख म्हणून काम केले आहे.

### 'एबीसी' ब्युरोच्या व्यवस्थापन परिषदेतील सदस्य

● **मोहित जैन** (बेनेट कोलमन अँड कंपनी लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रकाशन) : **उपाध्यक्ष** ● आदिलकसाद : सरचिटणीस
**जाहिरातदार प्रतिनिधी :** ● **अनिरुद्ध हलदार** (टीव्हीएस मोटर कंपनी लिमिटेड)
● **पार्थो बॅनर्जी** (मारुती सुझुकी इंडिया लिमिटेड)
**प्रकाशक प्रतिनिधी :** ● **ध्रुबा मुखर्जी** (एबीपी प्रा. लि.) मानद सचिव,
● **रियाद मॅथ्यू** (मल्याळम मनोरमा को. लि.) ● **गिरीश अग्रवाल** (डीबीसी कॉर्प. लि.) ● **शैलेश गुप्ता** (जागरण प्रकाशन लि.) ● **प्रतापराव पवार** (सकाळ पेपर्स प्रा. लि.) ● **करण दर्डा** (लोकमत मीडिया प्रा. लि.) ● **आदिमूलम** (दिनामलार)
**जाहिरात एजन्सी प्रतिनिधी :** ● **विक्रम सखुजा** (मॅडिसन कम्युनिकेशन्स प्रा. लि.) मानद कोषाध्यक्ष ● **निवासन के. स्वामी** (आर के स्वामी प्रा. लि.)
● **प्रशांत कुमार** (ग्रुप एम. मीडिया इंडिया प्रा. लिमिटेड)
● **वैशाली वर्मा** (इनिशिएटिव्ह मीडिया (इंडिया) प्रा. लि.)
● **सेजल शाह** (पब्लिसिस मीडिया इंडिया ग्रुप)

## भक्तिमय वातावरणात मॉर्गनव्हिल येथे गणेशोत्सव

न्यू जर्सी (अमेरिका), ता. ४ : २००२ पासून भारतीय संस्कृती आणि परंपरा जोपासणारा मॉर्गनव्हिल येथील मंदिरात पाच दिवसांचा गणेशोत्सव भक्तिभाव, सांस्कृतिक वैभव आणि सामुदायिक उत्साहाने साजरा करण्यात आला.

एचएटीसीसी संस्थेने १९९५ मध्ये मॉर्गनव्हिल येथे ३२ एकर जागा विकत घेतली आणि कालांतराने भव्य मंदिर, सभागृह व पुजारी निवासस्थाने उभी राहिली. १ जुलै २०१२ रोजी महाकुंभाभिषेकाने मंदिराचे अनावरण झाले आणि भक्तांसाठी हे ठिकाण खरेच श्रद्धेचे केंद्र बनले. गणेशोत्सवासाठी गेल्या दहा-बारा वर्षांपासून अनेक कुटुंबांनी आपला वेळ, श्रम आणि आर्थिक योगदान अर्पण केले. गणपती बाप्पाच्या आगमनाने पाच दिवसांच्या या सोहळ्याची सुरुवात झाली. आगमनाची व्यवस्था हेमंत बेंद्रे, प्रवीण देव आणि प्रशांत कोल्हटकर यांच्या देखरेखीखाली पार पडली. पाच दिवसांत भक्तिगीत, शास्त्रीय संगीत, भजन आणि नृत्य यांचा अखंड प्रवाह वाहत होता. उत्सवाच्या काळात दररोज प्रसादाचे भोजन होते, तर त्याचे पाचव्या दिवशी ८०० लोकांसाठी भव्य मेजवानीच्या रूपांतर झाले.


**कोंकण रेलवे कॉर्पोरेशन लिमिटेड**
**(भारत सरकार का उपक्रम)**
**रोजगार अधिसूचना**

केआरसीएलने खालील प्रकल्पांसाठी निश्चित मुदतीच्या कराराच्या आधारावर आणि पुनर्रोजगाराच्या आधारावर वॉक-इन-इंटरव्ह्यूद्वारे रोजगार अधिसूचना प्रकाशित केली आहे. तपशील खालीलप्रमाणे आहेत:

| क्र. सं. | अधिसूचना संख्या | अधिसूचना दिनांक | विभाग | तरीका | पद का नाम | पदों की संख्या | वाक-इन-इंटरव्यू की तिथि |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | सीओ/पीआर/8सी/2025 | 28.08.2025 | विद्युत | थेट करारावर | सहाय्यक विद्युत अभियंता | 10 | 12.09.2025 |
| | | | | | वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक/विद्युत | 19 | 15.09.2025 |
| | | | | | कनिष्ठ तांत्रिक सहाय्यक/विद्युत | 21 | 16.09.2025 |
| | | | | | तांत्रिक सहाय्यक/विद्युत | 30 | 18.09.2025 |
| 2 | सीओ/पीआर/9सी/2025 | 01.09.2025 | यांत्रिक | | रोड मोबाईल क्रेन ऑपरेटर | 1 | 22.09.2025 |
| 3 | सीओ/पी/ई/आरई/04/2025 | 01.09.2025 | सिविल-यूएसबीआरएल | पुनर्रोक्तीच्या आधारावर | एईएन/पीडब्ल्यूए आणि बोगदा | 1 | अधिसूचनेत अर्ज स्वीकारण्याची शेवटची तारीख नमूद करण्यात आली आहे. |
| | | | | | एसएसई/पीडब्ल्यूए | 2 | |
| 4 | सीओ/पी/ई/आरई/05/2025 | 01.09.2025 | लेखा आणि वित्त | | मुख्य वित्त व्यवस्थापक | 1 | |
| | | | | | मुख्य वित्त व्यवस्थापक/प्रकल्प | 1 | |

उमेदवार केआरसीएल वेबसाइट **www.konkanrailway.com** वर → भर्ती → वर्तमान अधिसूचना या लिंकद्वारे अधिसूचनेचे तपशील, पात्रता निकष इत्यादी तपासू शकतात आणि त्यानुसार अर्ज करू शकतात.

**मुख्य कार्मिक अधिकारी**



**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**सार्वजनिक आरोग्य विभाग**



**आपले घर, इमारत व कार्यालय मलेरिया / डेंग्यू मुक्त आहे का ?**



**साठलेल्या उघड्या स्वच्छ पाण्यात डेंग्यू / मलेरियाचे डास अंडी घालतात व तेथून डासांची पैदास होते, ती टाळण्यासाठी हे करा...**

❊ **नियमितपणे पाणी बदला.**
फुलदाण्या, शोभिवंत झाडांचे पाणी, कुंड्याखालील प्लेटमधील पाणी दर ३-४ दिवसांनी बदला.

❊ **पाणीसाठे झाकून ठेवा.**
पाण्याचे ड्रम, टाक्यांना घट्ट झाकण लावा, कपड्याने झाका.

❊ **साचलेले पाणी काढून टाका.**
फ्रिजच्या मागील ट्रे, ए.सी. डक्ट, पशुपक्ष्यांसाठी पाण्याची भांडी आठवड्यातून एकदा कोरडी करा, इमारतीचा डक्टचा भाग स्वच्छ ठेवा.

❊ **अनावश्यक वस्तू काढून टाका.**
आवारातील प्लास्टिक बाटल्या, कुंड्या, बादल्या, रंगाचे रिकामे डबे, नारळाच्या करवंट्या, रिकामी शहाळी, निरुपयोगी टायर्स, भंगारचे साहित्य इ.

❊ **चालू बांधकामाच्या ठिकाणी** (पाण्याची टाकी, हौद, बाथरुम, लिफ्ट स्लॉट) डास उत्पती टाळा.

**कोरडा दिवस पाळा, हिवताप / डेंग्यू टाळा.**

**डासोत्पत्ती स्थाने**




❊ **खबरदारीचे उपाय** ❊

| डेंग्यूचा डास मुख्यत: दिवसा चावतो यासाठी | हिवतापाचा डास मुख्यत: रात्री चावतो यासाठी |
|---|---|
| १) पूर्ण अंग झाकेल असे कपडे शक्यतो परिधान करा. | ३) खिडक्यांना जाळ्या बसवा |
| २) मॉस्क्युटो रिपेलंटचा वापर करा. | ४) झोपताना मच्छरदाणीचा पापर करा. |

येता कणकण तापाची, करा तपासणी रक्ताची!
आपल्या नजीकच्या आरोग्य केंद्र / रुग्णालयाशी संपर्क साधा !

**राधाबिनोद अ. शर्मा** (भा.प्र.से.)
**आयुक्त तथा प्रशासक,**
**मिरा भाईदर महानगरपालिका**

दि. ०४/०९/२०२५
जा.क्र. मनपा/मावज / E-6680578/2025-26



**दि ग्रेट इस्टर्न शिपिंग कंपनी लिमिटेड**

**CIN:** L35110MH1948PLC006472
**नोंदणीकृत कार्यालय :** ओशन हाउस, १३४/ए,
डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई-४०० ०१८.
**दूरध्वनी क्र.** +९१ (२२) ६६६१३०००/२४९२२१००; **फॅक्स क्र.** +९१ (२२) २४९२५९००
**ई-मेल :** shares@greatship.com; **संकेतस्थळ :** www.greatship.com

**प्रत्यक्ष भागाच्या हस्तांतरण विनंतीच्या री-लॉजमेंटसाठी विशेष खिडकीची सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येते की, गुंतवणूकदारांना गुंतवणूक सुलभ करण्यासाठी आणि त्यांनी खरेदी केलेल्या सिक्युरिटीजमध्ये गुंतवणूकदारांचे हक्क सुरक्षित करण्यासाठी, सेबीने त्यांचे २ जुलै २०२५ चे परिपत्रक क्रमांक SEBI/HO/MIRSD/MIRSD-PoD/P/CIR/2025/97 द्वारे, १ एप्रिल २०१९ च्या अंतिम मुदतीपूर्वी दाखल केलेल्या आणि कागदपत्रांमध्ये/प्रक्रियेत/किंवा कारणांमुळे नाकारलेल्या/परत केलेल्या/उपस्थित न केलेल्या हस्तांतरण करारांच्या री-लॉजमेंटसाठी ०७ जुलै २०२५ पासून ते ०६ जानेवारी २०२६ पर्यंत सहा महिन्यांच्या कालावधीसाठी एक विशेष खिडकी उघडली आहे.

या कालावधीत, हस्तांतरणासाठी री-लॉज केलेल्या सिक्युरिटीज (आजपर्यंत सूचीबद्ध कंपनी/आरटीएकडे प्रलंबित असलेल्या विनंतीच्या समावेशासह) हस्तांतरण-सह-डीमॅट विनंतीसाठी योग्य प्रक्रिया पूर्ण केल्यानंतरच डीमॅट पद्धतीने जारी केल्या जातील.

ज्या गुंतवणूकदारांनी ३१ मार्च २०२१ ही पूर्वीची अंतिम मुदत चुकवली आहे, त्यांना खालील पत्त्यावर कंपनी किंवा आरटीएकडे आवश्यक कागदपत्रांसह त्यांच्या विनंत्या सादर करून या संधीचा लाभ घेण्यास प्रोत्साहित केले जाते.

| गुंतवणूकदार सेवा विभाग | रजिस्ट्रार अँड ट्रान्सफर एजंट (RTA): |
|---|---|
| **द ग्रेट ईस्टर्न शिपिंग कंपनी लिमिटेड**<br>ओशन हाऊस, १३४/ए, डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई- ४०० ०१८<br>ईमेल आयडी-<br>shares@greatship.com | **कफिन टेक्नॉलॉजिज लिमिटेड (युनिट: दि ग्रेट ईस्टर्न शिपिंग कं. लि.)**<br>सेलेनियम टॉवर-८, प्लॉट क्र. ३१-३२, फायनॅन्शियल डिस्ट्रिक्ट, नानकरामगुडा, सेरिलिंगमपल्ली, गाचीबोवली, हैदराबाद, तेलंगणा-५०००३२<br>ईमेल आयडी-<br>einward.ris@kfintech.com |

दि ग्रेट ईस्टर्न शिपिंग कंपनी लिमिटेडकरिता

ठिकाण : मुंबई
दिनांक : ५ सप्टेंबर २०२५

**आनंद पुंडे**
**कंपनी सचिव**



hgs

**हिंदूजा ग्लोबल सॉल्युशन्स लिमिटेड**

(**CIN :** L92199MH1995PLC084610)
**नोंदणीकृत कार्यालय :** टॉवर सी (१ ला मजला), प्लॉट सी-२१,
जी ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१
**दूरध्वनी :** +९१ २२ - ६१३६ ०४०७
**ई-मेल आयडी :** investor.relations@teamhgs.com | **संकेतस्थळ :** www.hgs.cx

**सूचना**
**IEPF च्या समभागांचे हस्तांतरण**

याद्वारे **सूचना** देण्यात येते की, कंपनी कायदा २०१३ ('दि ॲक्ट') चे कलम १२४ (६) नुसार, गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरण (अकाउंटिंग, ऑडिट, ट्रान्स्फर अँड रिफंड) नियम, २०१६ वेळोवेळी झालेल्या सुधारणेसह ('दि रुल्स') सह वाचावा, हिंदूजा ग्लोबल सॉल्युशन्स लिमिटेड, ( 'दि कंपनी') सलग ७ वर्षांसाठी (त्यांच्या बाकी लाभांश खात्याच्या हस्तांतरणाच्या दिनांकापासून) सभासदांद्वारे जो दावा/रोखीकरण केलेले नाही अशा समभागांचे हस्तांतरण करु इच्छित आहे. त्याचबरोबर, आर्थिक वर्षे (FY) २०१८-१९ साठी २ ऱ्या अंतरीम लाभांशाच्या संबंधित जे समभाग सलग सात वर्षांच्या कालावधीसाठी देण्यात न आलेले/दावा न केलेला आहेत ते डिसेंबर २०२५ च्या २ ऱ्या आठवड्यामध्ये IEPF कडे हस्तांतरित करण्यात येतील.

नियमांमध्ये असलेल्या तरतुदींनुसार, संबंधित भागधारकांना संबंधित पत्रव्यवहार पाठविण्यात आलेला आहे, त्यांना विनंती करण्यात येते की, देण्यात न आलेला/ दावा न केलेल्या लाभांशाचा दावा करावा, जर, ०७ डिसेंबर २०२५ रोजी किंवा त्यापूर्वी संबंधित सभासदांकडून वरील लाभांशाच्या रोखीकरणासाठी कोणताही प्रतिसाद कंपनीकडे प्राप्त झाला नाही तर कंपनी डिसेंबर २०२५ च्या २ ऱ्या आठवड्यात संबंधित समभाग IEPF कडे हस्तांतरित करील.ज्यांचे भाग IEPF कडे हस्तांतरीत करण्यास योग्य आहेत अशा सभासदांचा तपशील www.hgs.cx येथे 'इन्व्हेस्टर्स टॅब'अंतर्गत अपलोडेड करण्यात आलेला आहे आणि हेच IEPF च्या भागांच्या हस्तांतरणाच्या हेतूसाठी कंपनीद्वारे डुप्लीकेट भाग प्रमाणपत्राच्या जारीसाठी पुरेशी सूचना दिल्याचे मानण्यात येईल.

IEPF कडे अशा समभागांचे आणि लाभांशाचे हस्तांतरण केल्यानंतर, कंपनीविरुद्ध कोणताही दावा करता येणार नाही आणि IEPF कडे कंपनीद्वारे समभागांचे हस्तांतरण करण्यात येईल. तथापि, कायदा आणि नियमांच्या तरतुदीनुसार संबंधित सभासद हस्तांतरित भागांचा दावा आणि बाकी/ दावा न केलेला लाभांश IEPF प्राधिकरणाकडे करू शकतो. ज्याचा तपशील www.iepf.gov.in वर उपलब्ध आहे/होईल.

या बाबतीत कोणत्याही मदतीसाठी संबंधित सभासदांनी कंपनीचे निबंधक आणि हस्तांतरण प्रतिनिधी म्हणजेच कफिन टेक्नॉलॉजिज लिमिटेड येथे १८०० ३०९ ४००१ किंवा einward.ris@kfintech.com किंवा कंपनी investor.relations@teamhgs.com येथे संपर्क साधावा.

**हिंदूजा ग्लोबल सॉल्युशन्स लिमिटेडकरिता,**
सही/-
**नरेंद्र सिंग**
**कंपनी सचिव**
**F4853**

ठिकाण : मुंबई
दिनांक : ४ सप्टेंबर २०२५